कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ११८ /२०२६ दि. ०४ /०६/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **कापुरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे महानगरपालिका वर्तकनगर प्रभाग समिती कार्यक्षेत्रात केंद्रशासनाच्या अमृत २.० योजनेच्या अंतर्गत पाणी पुरवठा विभागा कडील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे मजबुतीकरण व विस्तारीकरण करण्याचे काम बी.पी.सी.एल. पेट्रोल पंप, माजिवडा, ठाणे समोरून जाणारे ठाणे – घोडबंदर या मुख्य वाहीनीवर पाईप लाईन टाकण्याचे काम दि.०५/०६/२०२६ ते दि.०८/०६/२०२६ रोजी पावेतो करण्यात येणार आहे. सदर ठिकाणावरून जाणारा रस्ता हा सदर कामामुळे अरूंद होणार असुन वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) नाशिक मुंबई वाहीनीवरून माजिवडा चढणी येथील हायईट बॅरेकेट येथुन स्लीप रोडने गोल्डन नाका मार्गे घोडबंदर तसेच गोकुळ नगर कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहंनाना **माजीवडा चढणी येथील हाईट बॅरेकेट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही माजिवडा ब्रिजवरून सरळपुढे जावुन, कॅडबरी जंक्शन/सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक ०५/०६/२०२६ रात्री सायंकाळी १७:०० वाजे पासुन ते दिनांक ०८/०६/२०२६ रोजी रात्रौ २०:०० वाजे पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.